**Review Of Research**
**Volume-2, Issue- 4 , Jan -2013**
**ISSN : 2249-894X** Available online at www. lbp.world

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य

**डॉ. सुरेश निळकंठराव काळे**
इतिहास विभाग प्रमुख, एच.बी.टी. कला व वाणिज्य महाविद्यालय, न्यु सुभेदार, नागपूर.

**सारांश**

इ.स. १८९१ ते इ.स. १९५६ पर्यंतचा काळ हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कालखंड आहे. या कालखंडात महाराष्ट्रात भारतीय समाजव्यवस्थेप्रमाणे रचना दिसून येते. समाजाचे व्यक्ती, कुटूंब, जाती व वर्ण हे चार घटक आहे. प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली संयुक्त कुटूंब पद्धती याही काळात अस्तित्वात होती. यामध्ये एक—दोन पिढयांची माणसे एकत्र राहत असे. जातीव्यवस्था हा भारतीय हिंदू समाजव्यवस्थेचा घटक असून ती प्राचीन सामाजिक संस्था आहे. भारतात सुमारे आठ हजार जाती आहे. या जाती मध्ये भेदाभेद आहे. प्रत्येकजण आपलीच जात श्रेष्ठ समजत असे याला महाराष्ट्रही अपवाद नव्हता. ब्राम्हणाचे स्थान समाजामध्ये सर्वश्रेष्ठ होते. देशस्थ, कोकणस्थ असा वाद त्यांच्यात होता. मराठा व कुणबी यांच्यातही भेद होता. तेली, माळी, न्हावी, शिंपी, कुंभार, धनगर, सुतार, गोंधळी, गुरव अशा वेगवेगळया जातीतही समाज विभागला होता. त्याचप्रमाणे ज्यांना दलित म्हटले जात होते, त्यामध्ये महार, मांग, चांभार, ढोर यांच्यातही वाद होता.या अस्पृश्य समजल्या गेलेल्या जातीत ही एकसंघता नव्हती. त्यांच्यातही जातीभेद होता. समाजजातीभेदाने तो पोखरला गेला होता. दलितांना अपमानित पराभूत व अन्यायी जीवन जगावे लागत होते. शूद्र कीटकांप्रमाणे गलिच्छपणात जगण्याची व दु:ख दारिद्र्यात पिचण्याची त्यांच्या शतकानुशतके सक्ती झालेली होती. महाराष्ट्रातील समाजरचनाही चातूरवर्ण व्यवस्थेवर आधारलेली ती. जातीव्यवस्था ही ईश्वराची निर्मीती आहे.असे सांगितले गेले होते. त्यामुळे जातीव्यवस्थे विरुद्ध कोणीही बंड केले नव्हते.[१]

इ.स. १९२० ते १९३० या काळात हिंदुस्थानात ज्या अभूतपूर्व क्रांतिकारक, राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि कामगार वर्गीय चळवळी झाल्या. त्यात अस्पृश्यांनी सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रात आपले हक्क मिळविण्यासाठी जे बंड उभारले ते सर्वतोपरी श्रेष्ठ होय. कारण अस्पृश्यांच्या चळवळींना पैसा व मनुष्यबळ यांचा पाठींबा नव्हता आणि सवर्ण हिंदूचा विरोध होता. या चळवळींना जे प्रथम पुढारी मिळाले ते चाकोरी बद्ध पद्धतीने चालणारे होते तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हया चळवळीची सुत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी अस्पृश्यांच्या चळवळीचा कायापालट घडवून आणला आणि अवघ्या तीन वर्षांच्या काळात हिंदू धर्माच्या श्रद्धा, परीघामध्ये हजारो वर्ष रुतून सवर्ण हिंदूचे वंशपरंपरागत गुलाम म्हणून जीवन जगत असलेल्या अस्पृश्यांमध्ये सामाजिक समतेसाठी हिंदूविरुद्ध उघड बंड उभे करण्याची इच्छाशक्ती व आत्मिक बळही त्यांनी निर्माण केले.

बाम्हो समाज आणि प्रार्थना समाज यांच्या प्रवर्तकांनी प्रत्यक्ष सामाजिक संघर्ष टाळून अस्पृशांच्या बाबतीत जे काही थोडेफार करता येईल ते केले. श्रीमंत सयाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज हया राजाने अस्पृश्यंता निवारणाच्या प्रश्नाला महाराष्ट्रात बरीच गती मिळाली. कर्मवीर वि.रा. शिंदे यांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी महात्मा ज्योतीबा नंतर संघटित असा पहिला प्रयत्न केला. परंतू

महात्मा ज्योतीबा फुले यांच्या कार्यानंतर अस्पृशांच्या ह्दयात आत्मोन्नतीचा प्रकाश कोणीही पाडू शकला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ मार्च १९२४ रोजी दामोदर हॉलमध्ये समाजसेवकांची बैठक झाली. त्या बैठकित संस्थेला 'बहिष्कृत हितकारणी सभा' हे नाव द्यावे असे ठरले, डॉ. बाबासाहेब पुढे म्हणाले 'Educate, Agitate and Organise' (शिकवा, चेतवा, संघटीत करा) लोकांना सुशिक्षित करा. त्यांच्यात आपल्याहीन अवस्थेबद्दल चीड उत्पन्न करा आणि त्यांची संघटना निर्माण करा असे सभेचे ब्रीदवाक्य साहेबांनी ठरविले व २७ जुलै १९२४ ला वरील संस्था स्थापन झाली. शिक्षणप्रसार करणे, वाचनालये स्थापने, विद्यार्थी वसतिगृह काढणे, लायक विद्यार्थ्यास शिष्यवृत्या देणे व देवविणे, समाज जागृतीसाठी किर्तने, व्याख्याने आयोजित करणे, आर्थीक उन्नतीच्या जरुर त्या योजना व सुचना तयार करुन योग्य अधिकाऱ्यास सादर करणे.[२]

बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना म्हणजे भारतातील पददलितांना स्वावलंबन, स्वाभिमान आणि आत्मोद्धार यांची शिकवण देऊन देशात महापरिवर्तन घडवून आणणाऱ्या युगाचा आरंभच होय. आपल्या दु:ख, अवनत स्थितीची अस्पृश्यांना जाणीव होण्यास ज्या ज्ञानांजनाची जरुरी आहे ते त्यांच्याजवळ नव्हते. तो अभाव लक्षात घेऊन सभेने आपल्या कार्यक्रमात ज्ञानप्रसारास अग्रक्रम दिला. तरुण आणि प्रौढ अस्पृश्यांची सूधारणा घडवून आणण्यासाठी सभेने रात्रीच्या शाळा, वाचनालये सुरु करुन त्यांना वळण लावले. अश्याप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उपदेशाने, तेजस्वी विचारांनी अस्पृशांना हळूहळू चालना मिळू लागली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक जीवनातील महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते की, अस्पृश्यातील परंपरागत आचार विचार बदलून त्यांना माणूस म्हणून प्रतिष्ठेचे जीवन जगण्यासाठी प्रेरणा देणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० मार्च १९२७ ला महाडच्या चवदार तळयातील पाणी प्राशन करुन समतेचा हक्क बजावला. ज्या तळयातील पाणी पिण्यास पशू, पक्षी, प्राणी, जनावरे, परधर्मीय या कोणास मनाई नव्हती. परंतू अस्पृश्यास मात्र मज्जाव होता. परंतूडॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विषमतेची ही रुढी मोडूनअस्पृश्य हे हिंदू असल्यामुळे त्यानांही हा हक्क बजाविण्याचा तितकाच अधिकार आहे हे दाखवून दिले. भलेही नंतर सनातन्यांनी तळयाचे शुद्धीकरण केले असले तरी या घटनेने भारताच्या सामाजिक पुनर्रचनेच्या कार्याला एकदम कलाटणी मिळाली.[३]

चवदार तळयातील या घटनेचे पडसाद, तत्कालीन वृत्तपत्रातूनही उमटले. भाला, चाबूकस्वार, कुलाबा समाचार, केसरी, यंग इंडिया इत्यादी वर्तमान पत्रानी या घटनेची कडक शब्दात टीका केली. या सगळया टीकाकारांना उत्तरे देण्याकरीता म्हणून डॉ. आंबेडकरांना आपल्या स्वत:च्या वर्तमानपत्राची गरज भासू लागली ती गरज त्यांनी ३ एप्रिल १९२७ रोजी, 'बहिष्कृत भारत' नावाचे प्राक्षिक सुरु केले. बहिष्कृत भारताच्या निमित्याने डॉ. आंबेडकरांना असे शस्त्र मिळाले की या पत्रातून त्यांनी टीकाकारांचे टीकांचे खंडन तर केलेच त्याचबरोबर अस्पृश्य समाजाच्या हिताच्या दृष्टीने देशातील घडामोडीकडे लक्ष देऊन त्यांचे गाऱ्हाणे, त्यांची मते आणि त्यांच्या प्रतिक्रिया यांची सरकार दरबारी नोंद व्हावी आणि भावी राजकीय सुधारण्याच्या वेळी अस्पृश्यांना अधिकार मिळावे हा उद्देश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सफल झाला.

मनुस्मृती ही हिंदू समाजाचे सामाजिक, राजकीय, धार्मिकव आर्थिक संबंध जाम जखडून बांधणारी जुन्या पुरातण कायद्याची संहिता होती. ब्रिटिशांचे कायदे अस्तित्वात आल्यानंतर मनुस्मृतीतील कायद्याना न्यायालयात म्हणावे तितके महत्व राहीले नव्हते. न्यायालयात जरी मनुस्मृतीला जास्त महत्त्व नव्हते तरी हिंदू समाजातील चालीरितींना तिथे जो स्थिरपणा आणलेला होता तो तसाच चालू होता ब्रिटिश कायद्यांनी तो स्थिरपणा नष्ट करण्याची चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २८ डिसेंबर

१९२७ ला महाड येथे झालेल्या सत्याग्रह परिषदेत 'मनस्मृती दहनाचा' ठराव संमत झाला. मनस्मृतीचे दहन करण्यात आले. मनस्मृती म्हणजे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय आणि आध्यात्मिक दास्यांना स्थैर्य आणणारी महामायावी राक्षसीण आहे व तिचा त्रास सर्व हिंदू समाजाला होत होता. डॉ. आंबेडकरांनी भारतातील जाती या विषयांवर कोलंबिया विद्यापिठात वाचलेल्या शोध निबंधावरुन मनुस्मृतीचे सुक्ष्म अध्ययन त्यांनी केले होते हे आपल्याला कळते. मनुस्मृती दहनाच्या कृतीवर तत्कालीन पत्रांनी कठोर हल्ले चढविले त्याला उत्तर देताना डॉ. आंबेडकरांनी इशारा दिला होता की, अस्पृश्य समाज हा हल्लीच्या काळी पेटलेला अग्नी आहे. त्याच्याशी खेळू नका.[४]

जोपर्यंत आम्ही आपणांसे हिंदू म्हणवीत आहो आणि तुम्ही आम्हास हिंदू समजत आहात, तोपर्यंत देवळात जाऊन देवदर्शन घेणे हा आमचा हक्क आहे. असे आम्ही समजतो. आम्हास आमच्या जातीकरीता निराळी देवळे नकोत. देवळावाचून आमचे काही अडले नाही. ज्यांना देशभक्ती करावयाची आहे, त्यांना देऊळच पाहिज असे नाही. सामाजिक उपासना व सामाजिक संमेलन अथवा ऐक्य यांच्यासाठी देऊळ पाहिजे असतात. आम्हाला समाजात समान हक्क पाहिजेत ते आम्ही शक्यतोवर हिंदू समाजात राहून आणि जरुर तर कवडीमोल ठरलेल्या हिंदूत्वावर लाथ मारुन मिळविणार आहोत आणि हिंदूत्वावर पाणी सोडण्याची पाळी आली, तर अर्थातच आम्ही देऊळाच्या वाटेला जाणार नाही.[५]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह देखील अस्पृश्यांना समान हक्क मिळावे याच भूमिकेतून केला होता. पुणे, पेशवाई व पर्वती ही नावे जेव्हा जेव्हा कानावर येतात किंवा डोळयांना दिसतात तेव्हा डोळयासमोर येते विलासस्थळे, ब्राम्हणेतरांचे छळ व पिळवणूक आणि अस्पृश्यांवर झालेले अमानुष अत्याचार यांची चित्रे मराठी राज्याचे सर्व अधिकार आल्यानंतर पेशव्यांनी ब्राम्हण जातीचे श्रेष्ठतव हिंदू समाजात प्रस्थापित करण्याचा कार्यक्रम पद्धतशीरपणे चालू ठेवला. पुणे हे महाराष्ट्रीय संस्कृतीचे व बौद्धीक सामर्थ्याचे जरी केंद्र झालेले असले तरी तेथे पेशवे यांचे वर्चस्व होते. त्यांच्या वर्चस्वाला पायबंद घालावा यासाठी पर्वती मंदिरात अस्पृश्यांनी प्रवेश करावा आणि वेळ पडेल तर सत्याग्रह करावा असे ठरले. दिनांक १३ आक्टोंबर १९२९ ला दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी रविवारी सत्याग्रह सुरु झाला त्यातही फार मोठया अडचणी आल्या. परंतू सर्व अडचणीवर मात करुन पर्वतीचा सत्याग्रह केला मंदिर प्रवेश केला. त्यानंतर नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रह सुरु झाला. हा सत्याग्रहाची चर्चा सरकार विनंती पत्र सुरु होते यातच ५ नोव्हेंबर १९३१ रोजी काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह करण्यात आला. काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह बरोबर नाशिक येथिल रामकुंड प्रवेश व सिताकुंड प्रवेश सत्याग्रह करुन मंदिरात प्रवेश मिळविला.[६]

डॉ. बाबासाहेबांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन केली. अस्पृश्यता निवारणाची चळवळ, महाडचा, चवदार तळयाचा सत्याग्रह, मंदिर प्रवेशातील पर्वती सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, इत्यादी सामाजिक चळवळीतून, सत्याग्रहातून किंवा आंदोलनातून त्यांनी अस्पृश्यांमध्ये स्वाभीमानाची भावना जागृत करणे, आपले हक्क याकरिता लढणे, त्यांच्यात असलेल्या मतभेदाचे निवारण करण्याचे कार्य केले.

## संदर्भ सुची

१) कठोर अनिल, वाघमारे महादेव, पाटील गौतम, महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास (इ.स. १८९१ ते १९३७), चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २००९, पृष्ठ क्र. ९,१०.
२) खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड — २, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. क्र. १२१, १२२.
३) कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८५, पृ.क्र. ८३.
४) बहिष्कृत भारत : ३ जानेवारी १९२८.

५) कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पापुलर प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती, १९८९, पृ.क्र. ८२.
६) जनता : १९ डिसेंबर १९३१.